ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# भारतातील ग्रामीण असंघटित महिला मजुरांना मिळणाऱ्या मोबदल्याची विषमता

*डॉ.प्रशांत कांबळे

* S.N.D.T. College of Arts & S.C.B. College of Com & S. C. B. for women's Churchgate, Mumbai.

**शोध सारांश:**

*स्त्रियांच्या जीवनाकडे पहिले असता ग्रामीण स्त्री हा फार मोठा घटक खेड्यामध्ये वास्तव्य करतो त्यामुळे ग्रामीण महिलांच्या वाट्याला आलेले जीवन अभ्यासणे महत्वाचे ठरते. स्त्री ही आई, बहीण, पत्नीची भूमिका पार पाडत कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पेलत असते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रिया पुरुषांवर अवलंबून असल्याने त्यांना स्वतःचा निर्णय घेण्याचा फारसा अधिकार नाही. स्त्रीला शिक्षित केल्याने संपूर्ण समाज बदलण्यास मदत होते असे म्हटले जाते. जेव्हा संपूर्ण समाज सामाजिक जाणीव किंवा सामाजिक विकास निर्माण करतो, तेव्हा सामाजिक परिवर्तन होण्यास मदत होते. समाजात, जेव्हा स्त्रिया वैयक्तिक विकासासाठी निर्णय घेतात तेव्हा त्याला महिला सक्षमीकरण म्हणतात. भारतीय संविधानानुसार, कलम 14 समानतेची हमी देते तर कलम 15 आणि 16 धर्म, वंश, लिंग आणि जन्मस्थानाच्या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंधित करते जे भारतातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी मदत करते. महिला सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. परंतु याशिवाय महिलांना शासन, स्वयंसेवी संस्था आणि सहकारी संस्था इत्यादी च्या विविध स्रोतांकडून आर्थिक मदत मिळाल्यास महिला सक्षमीकरण च्या समृद्धीसाठी महत्त्वाचे घटक ठरतील. महिला सक्षमीकरण म्हणून विकास आणि कल्याण हे सर्वच महिलांना सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्यास मदत करते. हा शोध निबंध ग्रामीण महिलांच्या सर्वसमावेशक विकासावर वर केंद्रित आहे ज्यामधे सामाजिक,आर्थिक,संस्कृतिक, राजकीय विकासाचा समावेश आहे.*

***पारिभाषिक शब्दावली-*** स्त्री जीवन, मजुरीत विषमता, महिला सक्षमीकरण, आर्थिक विकास, ग्रामीण विकास, सामाजिक परिवर्तन.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना :**

भारत देशात एकूण लोकसंखेच्या 50% स्त्रिया आहेत. भारताचे सविधान मूलभूत हक्काच्या द्रृष्टीने स्त्री-पुरुष समानता मान्य करते. भारतीय राज्यघटनेनुसार स्त्री-पुरुषांना समान अधिकार, निर्णयात घेण्याच्या अधिकारात समानता, संधी मिळायला हवी. आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य देणे, जेणेकरुन राष्ट्राला स्त्रियांच्या मानवी हक्काचे संरक्षण करता येईल.

ग्रामीण भागात रोजगाराच्या कमी संधी याहून बहुतांश महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असते. त्यामुळे दुसरे कुठले काम सुरू करायचे म्हटले तरी दुसऱ्या पर्यायाचा फारसा विचार करता येत नाही. शिवाय मुलांच्या जबाबदारीचा गाडा या महिला एकट्याने रेटत

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS

Original Research Article

असतात. ९०% महिलांचे रोजीरोटी कमावण्याचे माध्यम हे शेतमजुरी, घरगुती गोळ्या-चॉकलेटचे दुकान, भाजीपाला विक्री, बिगारी काम किंवा  मनरेगा रोजगार हमी योजनेत जर कधी काम मिळाले तर हे असते. काहीजणी  जर गावात कुठला समारंभ असेल तर त्या ठिकाणी स्वयंपाक  करण्याचे काम करतात. या सगळ्या कामाची मजुरी पुन्हा वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी असल्याचे दिसून येते. बचत गटांनी ग्रामीण भागातील  महिलांना सक्षमपणे जगण्याचे एक साधन मिळाले आहे. ज्या काही महिला बचत गटाच्या सदस्य आहेत त्यांना गटाच्या माध्यमातून अडीअडचणीच्या वेळी मोलाची मदत होते.

ग्रामीण  क्षेत्रातील कामगार' म्हणजे रोजंदारीवर, थेट किंवा दलालामार्फत, स्वतः कंत्राट घेऊन किंवा स्व-रोजगार पद्धतीने, स्वतःच्या घरातून किंवा इतर कोणत्या ही ठिकाणावरून काम करीत असते.

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा 'आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस' म्हणून साजरा केला जातो संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने सन २००७ मध्ये दरवर्षी १५ ऑक्टोबर हा 'आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस' म्हणून साजरा करण्यासंबंधी ठराव संमत केला. ही कल्पना सर्वप्रथम सन १९९५ च्या बीजिंग येथील जागतिक महिला परिषदेमध्ये मांडली गेली होती. दरवर्षी १६ ऑक्टोबर हा 'जागतिक अन्न दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो व त्याचे औचित्य साधून १५ ऑक्टोबरला ग्रामीण महिला ज्या खऱ्या अर्थाने अन्नदात्या आहेत, त्यांच्या नावाने साजरा करावा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय महिला संघटनांनी केले होते

राजकारणातील महिलांचा नगण्य असलेला सहभाग हा राजकारण, समाजकारणाच्या दृष्टीने नेहमीच चिंतेचा विषय राहिलेला आहे. पुरुषसत्ताक समाजव्यवस्था आणि त्यात गुंतागुंतीचे असलेले जातवास्तव या त्यात महिलांच्या राजकारणातील प्रवेशाला आडकाठी करणाऱ्या ठरत आहे.

**अध्ययनाचे उद्दिष्ट:**

1. ग्रामीण महिलांना सद्यस्थितीत मिळणाऱ्या मजुरी दराचा अभ्यास करणे.

2. ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपाययोजना आढावा घेणे.

3) ग्रामीण महिलांच्या मानवी अधिकाराचे उल्लंघनाचा अभ्यास करणे.

4) ग्रामीण महिलांचा समाजातील भूमिका आणि दर्ज्यांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

हा शोध निबंध द्वितीय माहिती स्त्रोतावर  आधारित आहे. विविध लेख, शोधनिबंध, वर्तमानपत्रे जसे की, सकाळ, टाइम्स ऑफ इंडिया, लोकसत्ताक ,पुस्तके  इत्यादि.

**अध्ययनाचे  महत्व:**

हा अभ्यास ग्रामीण महिलाना मिळणारा  मोबदला सोबतच त्यांचे सक्षमीकरण, एकाच कामाला स्त्री-पुरुषां मधील वेगवेगळा मिळणारा

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS Original Research Article

मोबदला, महिलांचे शिक्षण, आर्थिक समस्या यावर केंद्रित आहे. शिक्षण तिच्या अस्तित्वासाठी आणि गरजांसाठी महत्त्वपूर्ण आहे, शिक्षणाच्या मदतीने ती इतर महिलांना प्रोत्साहित करू शकते तसेच, ग्रामीण महिलांची विशिष्ट आवड आणि त्यांची प्रतिभा समजून घेणे महत्त्वाचे आहे त्यांना सामाजिक, व आर्थिकदृष्ट्या साक्षर करणे अधिक महत्त्वाचे आहे जेणेकरून विविध गोष्टींशी संबंधित माहिती कार्यक्रम योग्य दिशेने राबविता येईल. स्वातंत्र्योत्तर काळातही स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी शिक्षित आहेत, ही तळागाळातील ग्रामीण भागातील मोठी समस्या आहे, शिक्षणाला प्राधान्य द्यायला हवे, सध्या ग्रामीण भागात पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण स्त्रियांपेक्षा जास्त असल्याचे आपण पाहतो, स्त्रियांचा शिक्षणा पासून आणि मिळणाऱ्या मोबदल्यापासून वंचित आहे हा मोठा प्रश्न आहे कामाचा मोबदला स्त्री आणि पुरुष यांना समान कामाला समान वेतन देणे ही समाजाची जबाबदारी आहे.

माहितीचे विश्लेषण आणि विवेचन :

भारतातील ग्रामीण महिलांना कमी मजुरी मिळण्याचे कारणापैकी एक महत्वाचे कारण म्हणजे त्यांच्यातील अशिक्षितता म्हणून त्यांच्या साक्षरतेच्या आकडेवारी विषयी माहिती पाहणे आवश्यक आहे.

**भारतातील स्त्री –पुरुष साक्षरता प्रमाण :**

| वर्ष | महिला | पुरुष |
|---|---|---|
| 1951 | 4.9% | 19.0% |
| 1961 | 10.1% | 34.3% |
| 1971 | 15.5% | 48.6% |
| 1981 | 21.7% | 49.6% |
| 1991 | 30.2% | 57.0% |
| 2001 | 46.7% | 71.4% |
| 2011 | 57.9% | 77.2% |
| 2017 | 65.0% | 81.5% |

**(स्रोत: भारताची जनगणना, रजिस्ट्रार जनरल कार्यालय, भारत)**

वरील तक्त्यात पुरुष - महिला साक्षरता दर दर्शविते. भारताच्या साक्षरतेच्या दरात गेल्या काही वर्षांत सातत्याने वाढ होत असल्याचे दर्शवित आहे. साक्षरतेच्या टक्केवारीत लक्षणीय सुधारणा झाली आहे, पुरुष साक्षरता दर 27.16 % वरून 82.14% पर्यंत वेगाने वाढला आहे. तर महिलांचा साक्षरता दर देखील 8.86% वरून 65.46 % पर्यंत वाढला आहे. तसेच प्राथमिक शिक्षण प्रत्येकासाठी मोफत आहे तरी सुद्धा शिक्षणातील प्रवेशात लिंगभेद फरक आकडेवारी वरून दिसून येते. साहजिकच त्याचा रोजगारावरही पुढे विपरीत परिणाम होतो.शिक्षणासाठी महिला आजही संघर्ष करत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातही स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी शिक्षित आहेत, ही तळागाळातील ग्रामीण भागातील मोठी समस्या आहे, शिक्षणाला प्राधान्य द्यायला हवे, सध्या ग्रामीण भागात पुरुषांच्या साक्षरतेचे

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS

Original Research Article

प्रमाण स्त्रियांपेक्षा जास्त असल्याचे आपण पाहतो, स्त्रियांचा शिक्षणा पासून वंचितता हा मोठा प्रश्न आहे, गावातील संकुचित वातावरण, आर्थिक अडचणी,पालकांची शिकविण्याच्या बाबतीत उदासिनता, लहान भावंडाचे संगोपन, घरचे काम व घरा बाहेरचे काम, अशा विविध कारणांनी महिलांचे शिक्षण ग्रामीण भागात कमी आहे,

ग्रामीण रोजगार योजना आणि उत्पन्न निर्माण करणाऱ्या योजना च्या संदर्भात स्त्रियांवर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे कारण राज्यांकडून पुरस्कृत कल्याणकारी योजना आणि घरादारातील श्रमविभागणी तसेच स्त्री - पुरुषांचे वेतन किंवा स्त्रियांना स्वतंत्रपणे रोजगाराची गरज किंवा उत्पन्न निर्माण करणाऱ्या संधी याविषयी कमी माहिती असते.

ग्रामीण भारतातील पुरुष-महिला साक्षरता दर

| वर्ष | महिला | पुरुष |
|---|---|---|
| 1951 | 4.9 | 19.0 |
| 1961 | 10.1 | 34.3 |
| 1971 | 15.5 | 48.6 |
| 1981 | 21.7 | 49.6 |
| 1991 | 30.2 | 57.0 |
| 2001 | 46.7 | 71.4 |
| 2011 | 57.9 | 77.2 |
| 2017 | 65.0 | 81.5 |

(स्रोत: भारताची जनगणना, रजिस्ट्रार जनरल कार्यालय, भारत)

वरील तक्त्यात असे दर्शविते की स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी शिक्षित आहेत. जी तळागळातील समस्या आहे. महिलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, त्यासाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रमाची ही गरज आहे.



ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS

Original Research Article

**भारतातील ग्रामीण महिलांची विविध कामातील कार्यरत स्थिती**

(Periodic Labour Force Survey (PLFS,2017-18 and 2018-19),NSO,MoSPI)

| वर्षे | कृषि | खाणकाम आणि उत्खनन | उत्पादन | बांधकाम | परिवहन आणि भंडारण | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1991 | 86.2 | 0.4 | 7.00 | 0.9 | 0.1 | 3.4 |
| 2001 | 85.5 | 0.4 | 7.6 | 1.1 | 0.1 | 3.7 |
| 2011 | 79.4 | 0.3 | 9.8 | 6.6 | 0.2 | 5.2 |
| 2019 | 73.2 | 0.2 | 8.1 | 5.3 | 0.3 | 8.9 |

(स्रोत: भारताची जनगणना, रजिस्ट्रार जनरल कार्यालय, भारत)

वरील तक्त्यात असे दर्शविते की, ग्रामीण स्त्रिया विविध कामात कार्यरत असून त्यांची संख्या कृषि क्षेत्रा मध्ये जास्त 73.2 % आढळून येते. जवळपास पुरुषांच्या बरोबरीने त्यांची संख्या आहे. तर 22.8 % स्त्रिया अकृषि क्षेत्रा मध्ये काम करतात. महिलांचे शिक्षण आणि रोजगार वाढल्याने महिला आणि पुरुष श्रमशक्ती यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होते आणि ती समाजाच्या विकासासाठी सहय्यक बनते.

**अध्ययनाची मर्यादा :**

हे अध्ययन द्वितीय स्त्रोतावर आधारित आहे.

या अध्यनाचा केंद्र बिन्दु ग्रामीण स्त्री कामगार आहे.

**मानवी अधिकाराचे उल्लंघन :**

स्त्री असो की पुरुष दोघांनाही मानवी अधिकार घटनेने प्रदान केले आहे. तेव्हा मानवी जीवनाची आवश्यक किमान गरजांची पूर्तता करण्यासाठी या अधिकाराची निर्मिती केली आहे. या अधिकाराच्या अभावामुळे मानवीय जीवन धोक्यात येऊ शकते. या अधिकारमध्ये पुरेसे अन्न, वस्त्र, निवारा, भुकेपासून मुक्ति, कामे करण्याची संधी, सामाजिक सुरक्षितता, शारीरिक व मानसिक आरोग्य, शिक्षण इत्यादींचा  मानवी अधिकारात समावेश होतो. ग्रामीण स्त्रियांच्या वाट्याला वेठबिगारी सारखी अवस्था आली आहे. या अवस्थेत कामगाराला वेठीस धरणे, गुलाम करणे, इच्छेविरुद्ध काम करायला लावणे, असे स्वरूप असते आणि असे करणे हे कायद्याने प्रतिबंध आहे.

लिंगभेद व वैवाहिक दर्जा या दोन गोष्टीमुळे स्त्रियांना आजही अन्याय सोसावा लागत आहे. स्त्रिया ह्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात महत्वपूर्ण भूमिका निभावतात परंतु त्यांच्या श्रमाचे मोल होत नाही. सामाजिक, आर्थिक, राजकीय, व शैक्षणिक पातळीवर संबंधीत आकडेवारीवरून निदर्शनात येते की, महिलांचा आसमान दर्जा मुख्यत्वे करून लिंग भेदामुळे निर्माण झालेला आहे

भूमिका आणि दर्जा :

वैदिक काळात स्त्रीचे समाजातील स्थान उच्च होते त्या काळात स्त्री ही आर्थिक बाबतीत अधिक क्रियाशील होती धार्मिक कार्यात सुद्धा तिचा सहभाग असत. वैदिक काळात स्त्रीला सन्मानाने वागविले जात. परंतु मध्ययुगीन काळापासून तर आधुनिक काळापर्यन्त येत स्थान आणि दर्जा मधील  परिस्थिति बदलली आहे.

व्यक्तीचे त्या समाजातील स्थान म्हणजे त्या व्यक्तीचे दर्जा होय. व्यक्तीचे लिंग, वय, कुल, गुणवत्ता, वैवाहिक स्थिति, व्यवसाय यावरून व्यक्तीचे स्थान ठरते कौटुंबिक संघटनेत ज्या रूढी पडल्या त्याद्वारे महिलांचा दर्जा व स्थान मातेचे व पत्नीचे मिळाले. आणि येथूनच स्त्रियांना चूल आणि मूल इथपर्यंत मर्यादित ठेवण्यात आले. ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि शरीरशास्त्राच्या अध्यनांनुसार स्त्री पुरुषांच्या भूमिकांमधील फरक दिसून येते. पुरातन काळापासून स्त्री-पुरुषां मधील भूमिका,कर्तव्य, जबाबदऱ्या याबाबतचे नियम आपल्या संस्कृतीत आणि धर्मग्रंथात दिसून येते. वेद, पुराणे, उपनिषदे, व मनुस्मूर्ती मध्ये आढळून येते की, पुरुष हा स्त्री पेक्षा निसर्गताच अधिक सबल असल्याने करता, मिळविता, अन्नधान्य उपलब्ध करून देणारा, कुटुंबाचा प्रमुख तर स्त्रिया शरीरिकदृष्ट्या तुलनेत दुर्बल, मृदु, बाल पोषणाच्या भुमिकेला योग्य  अशा भूमिके मधून पुरुषाला श्रेष्ठ व स्त्री ल कनिष्ठ स्थान प्राप्त झाले आणि येथूनच कामगाराला एकाच कामाला वेगवेगळा मोबदला देण्यात येऊ लागला आणि यासाठी कारण देऊ लागले की, पुरुषांच्या तुलनेत स्त्री ही शरीरिकदृष्ट्या दुर्बल आहे त्यामुळे ती  पुरुषांच्या तुलनेत कमी काम करते म्हणून तिला मोबदला कमी अशा ह्या विसंगत विचारसरणीमुळे पिढ्यान पिढ्या स्त्रीला कमी रोजगार मिळण्याची प्रथा पडली परंतु यामुळे समाजात स्त्रीच्या वाट्याला दारिद्रय आले , तिचे आर्थिक शोषण होत गेले. एखाद्या स्त्रीचा पती मृत्यू झाला असेल तर तिने कसे जगावे ,आपल्या मुला बाळाचे पालनपोषण कसे करायचे हा मोठा प्रश्न तिच्या पुढे असतो.

**स्त्रियांच्या वाट्याला बहुआयामी काम :**

ग्रामीण भारतात 86.1% स्त्रिया ह्या कृषि क्षेत्रात तर 7.1% स्त्रिया उध्योगातील व्यवसायात गुंतलेल्या आहेत. ग्रामीण महिलाना सकाळी उठल्यापासूनतर रात्री झोपी जात पर्यन्त विविध प्रकारचे काम करावे लागते शेतातील, घरातील अविरत काम करावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठी, इंधंनासाठी,वणवण भटकावे लागते उन्हाळयामध्ये तर फारच बिकट अवस्था असते. शिवाय कोंबडीपालन, दूधदुभत्याची व्यवस्था ही कामे बहुधा बायकांची असतात आणि त्यासाठी त्यांना वेतन मिळत नाही किंवा शेताच्या मालकी हक्कावरही त्यांचे नाव नसते. शेतमजूर म्हणून दुसऱ्यांच्या शेतावर राबणाऱ्या स्त्रियांनाही पुरुषांपेक्षा कमी मजुरी मिळते आणि आर्थिक शोषणालाही तोंड द्यावे

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS Original Research Article

लागते. कमी मजुरी मुळे बेकारीचा प्रश्न, गरिबी, निराधारपणा वाढतो. अधिक मुलांना जन्म घातल्यामुळे आणि पोषण आहारच्या अभावाणे त्यांची आरोग्य आणि कार्यक्षमता हळूहळू घटत जाते. शेतकरी व गरीब वर्गातील अधिकाधिक महिला रोजंदरीवर काम करतात गर्भा अवस्थेत सुद्धा मजुरी मिळत राहावी म्हणून काम करावे लागते याला कारण म्हणजे मिळणारी कमी मजुरी लहान बाळांना कामावर घेऊन ऊन, थंडी,पाऊस अश्या कोणत्याही मोसमात त्यांना काम करावे लागते तरीही त्यांना कमी मजुरी हा सरळ सरळ होणारा आर्थिक शोषण आहे.

लिंगभाव समतेची आवश्यकता :

स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीने विविध क्षेत्रात काम करू शकते हे मान्य झालेले असले तरी सामाजिक व पारंपरिक दृष्ट्या स्त्रियांच्या बाबतीत स्त्री-पुरुष समानतेच्या न्यायाने वागणूक दिली जात नाही. आर्थिक, संस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय दृष्टीनेही स्त्रियांना दुय्यम स्थान समाजाने दिले आहे. तिला अधिकारांपासून वंचित ठेवले जाते.महिलाना सक्षम करण्यासाठी बऱ्याच योजना आहेत परंतु ग्रामीण महिलांचा शिक्षणाचा अभाव, त्याबद्दलची अनास्था इत्यादीमुळे अडचणी येतात. आज स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे. ते बदलता येणे शक्य आहे. श्रम, पुनरुत्पादन, संचार, लैगिकता, संपत्ती यावरच्या हक्कांबाबतीत स्त्रिया दुय्यम स्थानावर आहेत. तसेच कुटुंब संस्था,धर्मसंस्था, न्यायसंस्था, शासनसंस्था, मीडिया याद्वारे तिचे दुय्यम स्थान अबाधित ठेवले जाते. समाजामध्ये सर्व स्तरावर स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे, ही जाणीव-जागृती निर्माण होण्यासाठी, पुरुषांच्या सत्तेचा पुनर्विचार (कुटुंब-वस्ती-गाव-आणि सामाजिक पातळीवर) करण्यास प्रवृत्त होण्यासाठी आणि शासनाची ध्येय –धोरणे, विविध उपक्रम , योजना-कार्यपद्धती व प्रत्यक्ष व्यवहार लिंगभाव दृष्टिकोनातून पाहणे व त्यात कोणते व कसे बदल करता येऊ शकतात याचा विचार करण्यास प्रवृत्त क्ररण्यासाठी समाजामध्ये लिंगभाव समानता प्रस्थापित होणे गरजेचे आहे. लिंगभाव समानता (Gender equality) भारतीय संविधानात त्याच्या प्रस्तावना, मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट केली आहे. लिंगभाव असमानता खाजगी, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात स्त्रियांच्या विकासात अडथळा आणत आहे. असमान ते मुळे जास्त संख्येने महिलांना अनौपचारिक, असंघटित क्षेत्रात राहण्यास भाग पाडले जाते, ज्यामुळे त्यांना आरोग्य, पोषण आणि शिक्षण, उत्पादकता, वित्तीय सेवा, करिअरची प्रगती किंवा सन्मान, सुरक्षितता सुनिश्चित करणारे कार्य, सुरक्षा या मूलभूत सेवांपासून वंचित ठेवले जाते.

बांधकाम आणि कृषि क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. कामाची वेळ आणि स्वरूपही सारखेच असते तरी सुद्धा स्त्री पुरुषांच्या तुलनेत कमी काम करते म्हणून पुरुष्यापेक्षा कमी मजुरी दिल्या जाते. याला मनरेगा सारख्या शासकीय योजना सुद्धा सुटल्या नाहीत.

**शिफारशी :**

1. ग्रामीण महिलांची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण करणे.

2. लिंगभाव, जातवर्ग -धर्म - यासारख्या विषमतांमुळे निर्माण झालेले अडथळे दूर करून त्यांचा संपूर्ण सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
3. शासकीय योजनांचे नियोजन, अंमलबजावणी व मूल्यांकन यामध्ये स्त्रियांचा संपूर्ण सहभाग घडवणे.
4. देशाच्या एकूण बजेटपकी शेतीच्या बजेटमध्ये ३०.तरतूद करणे व महिलाकेंद्रित योजनांची आखणी करणे %
5. महिलाना लघु उद्धयोग व स्वयंरोजगार साथी विशेष प्रशिक्षण देणे .
6. लिंगभावाधारित भेदभावशिवाय ग्रामीण महिलांची शेती उत्पादनाची आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे योग्य प्रशिक्षण देणे तसेच त्यांची क्षमता वाढविणे आवश्यक आहे .
7. विविध आर्थिक संधी निर्माण करणे आणि रोजगार, उद्योजकता आणि इतर उपजीविका कार्यक्रमांची सुधारित अंमलबजावणी करणे .

**निष्कर्ष :**

ग्रामीण स्त्री ही व्दिधा मनस्थितीत आहे. ग्रामीण महिलांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन साध्य करण्यासाठी सकारात्मक बदल आणि शाश्वत विकास आवश्यक आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेत स्त्रियांच्या भूमिकेचे महत्व लक्षात घेतले जात नाही. शेतात आणि कारखानदारीत कष्ट्ट करून कुटुंबाला पोसणारी स्त्री लाचारीतच जीवन जगते. अध्यापही ग्रामीण स्त्रीयांचे जीवन सरंजामशाहीत जखडलेले दिसते. अवहेलना, मानहानी, आणि अतोनात कष्ट्नी भरलेले आहे. साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे महिला अद्याप आर्थिक मागासलेल्या स्थितीत आहेत. भारतातील पुरुषी विचारसणी , पुरुषसत्ताक पद्धती, हजारो वर्षापासून स्त्रियावर लादलेली सामाजिक,संस्कृतिक,आर्थिक,गुलामी चूल आणि मूल इथपर्यंतच मर्यादित ठेवणे आजही सुरूच आहे. परिणामी ग्रामीण भागात आजही त्यांचे आर्थिक शोषण सुरू आहे. कामाचा मोबदला शारीरिक ताकदीवर दिला जातो. याचा सरळसरळ परिणाम हा देशाच्या विकासावर होतो. हे मात्र स्प्ष्ट आहे.देशाचा आर्थिक विकास जलद साधावयाचा असेल तर निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्री जातीला दुर्लक्षित करणे उचित होणार नाही. एक स्त्री संपूर्ण समाज बदलू शकते असं खरंच म्हटलं जातं पण तिला कुटुंब आणि समाजाच्या पाठिंब्याची गरज असते. त्यांना मिळणाऱ्या कामाच्या मोबदल्यातील विषमतेचे उच्चाटण झाले पाहिजे. किमान गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रामीण क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना किमान वेतन निछिचती मिळावी. स्त्री कामगार आणि पुरुष कामगारातील वेतनची दरी कमी करणं ही आज काळाची गरज आहे. ग्रामीण महिलांना कामगारांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे जेणेकरुन त्या पुढे येऊन उत्पादक क्रियाकलापांची क्षितिजे वाढवू शकतील. जेणे करून समाजाचा आणि देशाचा विकास जलद गतीने साध्य होईल.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS Original Research Article

**संदर्भग्रंथ :**

1) स्त्रि विकासाच्या पाऊल खुणा, डॉ. स्वाती कर्वे, पुणे.

2) INISTRY OF WOMEN AND CHILD DEVELOPMENT(https://wcd.nic.in/)

grameenfoundation.org

India sex ratio 2020-StatisticsTimes.com

भारतीय स्त्री आणि मानवाधिकार ,डॉ.स्मिता मेहेत्रे, श्री साईनाथ प्रकाशन,नागपुर.

भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, डॉ. बी. एम. कऱ्हडे, पिंपळपुरे पब्लिकेशन, नागपुर.

समाज आणि महिला, डॉ. निलम गोऱ्हे,पद्मगंधा प्रकाशक,पुणेण

स्त्री जीवनाची गुंतागुंत,विधूत भागवत,शर्मिला रेगे, वंदना पालासते,स्त्री अभ्यास केंद्र, पुणेविद्यापीठ

***Cite This Article:***

***डॉ.प्रशांत कांबळे*,(2022).** *मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक या संस्थेचे शैक्षणिक योगदान: एक अभ्यास. Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XI (I), 252-260.*